॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) ईद – ए- मिलादची सार्वजनिक सुट्टी राज्य शासनाने गुरुवार दि. २८ सप्टेंबर ऐवजी शुक्रवार दि. २९ सप्टेंबर जाहीर केली असली तरी नवीन महाविद्यालये/ परिसंस्था तसेच विस्तारांचे प्रस्ताव सादर करण्याची अंतीम तारीख ३० सप्टेंबर असल्यामुळे २८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संलग्नता विभागात कार्यालयीन वेळेत प्रस्ताव स्वीकारले जाणार आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ (३) (क) मधील तरतूदी नुसार नवीन महाविद्यालये/परिसंस्था तसेच विस्तारांचे प्रस्ताव सादर करण्याची अंतीम तारीख ३० सप्टेंबर असल्यामुळे विद्यापीठातील संलग्नता विभाग सुरु राहणार आहे. अशी माहिति कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक शनिवार दि. ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठात आयोजित करण्यात आली आहे. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली अधिसभेची ही बैठक होणार आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

..............................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २८ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी